Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar-431004
Maharashtra (India)
NAAC Re-accredited 'A+' Grade

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे 'अ+' दर्जा प्राप्त

संदर्भ क्र.: परीक्षा/समन्वय/२०२४/ 785-86

दिनांक : १९.१२.२०२४

**अतितात्काळ/प्रथम प्राधान्याचे/कार्यमर्यादेचे**

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Chhatrapati Sambhajinagar * Examinations

**प्रति,**
**विभाग प्रमुख/प्राचार्य/संचालक,**
**सर्व शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालय/परिसंस्था,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**छत्रपती संभाजीनगर**

विषय : राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या ४० तालुक्यांव्यतिरिक्त इतर तालुक्यामधील दुष्काळसदृष्य परिस्थिती घोषित केलेल्या १०२१ महसुली मंडळापैकी विभाजन झालेल्या नवीन महसूल मंडळांमध्ये दुष्काळसदृष्य परिस्थिती घोषित करुन सवलती लागू करण्याबाबत.

संदर्भ :
१) शालेय शिक्षण शासन निर्णय क्र. एफईडी-१५९२/१२०२/(११३२)/साशि-५, दि. १८ ऑक्टोबर, १९९३.
२) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७ दि. १० नोव्हेंबर, २०२३.
३) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७ दि. १६ फेब्रुवारी, २०२४
४) शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. २३ फेब्रवारी २०२४ रोजीचे पत्र.
५) याकार्यालयाचे पत्र क्र. परीक्षा/समन्वय/२०२४/१२११, दि. १३.०३.२०२४.
६) याकार्यालयाचे पत्र क्र. परीक्षा/समन्वय/२०२४/०७, दि. ०५.०४.२०२४.
७) याकार्यालयाचे पत्र क्र. परीक्षा/समन्वय/२०२४/१२२, दि. ०७.०५.२०२४.
८) सहसंचालक, उच्चशिक्षण, छत्रपती संभाजीनगर विभाग यांचे पत्र क्र. सहसं/उशि/औवि/महाडीबीटी/२०२४-२५/५१४८, दि. १४.१२.२०२४ रोजी पत्र
९) याकार्यालयाचे पत्र क्र. परीक्षा/समन्वय/२०२४/७५८, दि. १४.१२.२०२४.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्र क्र. ०८ च्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशान्वये विद्यापीठ प्रांगण व उपपरिसर, धाराशिव येथील सर्व संबंधित शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख, संचालक आणि विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थांचे संचालक यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाचे संदर्भ पत्र क्र. ०५, ०६ व ०७ अन्वये परीक्षा शुल्क माफीसंदर्भात माहिती सादर करण्यासंबंधी कळविण्यात आले होते, त्यानुसार सोबत जोडलेल्या यादीतील एकूण १२२ शैक्षणिक विभाग / महाविद्यालयांनी माहिती सादर केलेली आहे.

तथापि, सहसंचालक, उच्चशिक्षण, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयाने सदरील यादीचे अवलोकन केले असता महाविद्यालयांनी अचूक परिगणना केली नसून अचूक परिगणना करण्यात येऊन पुन्हा माहिती सादर करावी, असे उक्त संदर्भ क्र. ०८ अन्वये निर्देश दिले आहेत.

करिता, संदर्भ क्र. ०४ मधील अनुक्रमाक ०३ अन्वये प्राप्त झालेले सन २०२३-२४ च्या दुष्काळसदृष्य तालुक्यातील पात्र विद्यार्थी शिक्षण घेत असल्यास सदर लाभार्थ्यांना परीक्षा शुल्कापोटी भरलेल्या रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यासाठी त्यांचेकडून आलेल्या आवेदनपत्रावरुन प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करण्यासाठी सोमवार, दि. १६.१२.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मुल्यांकन कक्ष, राजर्षी महाराज परीक्षा भवन, विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे उपरोक्त माहिती व सर्व मूळ दस्तऐवजासह स्वखर्चाने उपस्थित राहण्याबाबत संदर्भ क्र. ०९ अन्वये कळविण्यात आले होते; परंतु सोबत जोडलेल्या यादीतील महाविद्यालय/परिसंस्थांचे प्रतिनिधी नमूद तारखेस अनुपस्थित

राहिलेले आहे. त्यामुळे जे महाविद्यालय/परिसंस्था अनुपस्थिती दर्शविलेली आहे. अशा सर्व महाविद्यालयांनी **सोमवार, दि. २३.१२.२०२४ रोजी सायं. ०५.०० वाजेच्या** आत संदर्भ क्र. ०९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती सादर करावी.

**तसेच ज्या महाविद्यालय/परिसंस्थांनी उपस्थित राहून माहिती सादर केली आहे व जे महाविद्यालय/परिसंस्था शनिवार, दि. २१.१२.२०२४ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत माहिती सादर करणार आहेत अशा सर्व महाविद्यालय/परिसंस्थानी सोबत जोडलेले हमीपत्र भरुन तात्काळ coordination.exam@bamu.ac.in ईमेल वर पाठवून त्याची एक प्रत प्राचार्य/संचालक यांच्याकडून प्रमाणित करुन समन्वय कक्ष, परीक्षा विभाग, विद्यापीठ परिसर यांना तात्काळ प्रतिनिधी मार्फत पाठविण्यात यावी.**

**तसेच जे महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे परीक्षा शुल्क माफीच्या प्रतिपुर्तीची रक्कमेसंबंधी अचूक परिगणना करुन देणार नाहीत अशा महाविद्यालय/परिसंस्थेचे परीक्षा शुल्क माफीबाबतच्या प्रस्तावावर कोणत्याच प्रकारची कार्यवाही करण्यात येणार नाही. असे शासनाचे आदेश आहेत. तसेच अचूक माहिती सादर न केलेल्या महाविद्यालयातील दुष्काळ सदृश्य तालुक्यातील पात्र विद्यार्थी सदर योजनेपासून वंचित राहील्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबधित शैक्षणिक विभागाचे प्रमुख/ महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक यांची राहील**

कोणत्याही परिस्थितीत दुष्काळ सदृश्य तालुक्यातील पात्र विद्यार्थी सदर योजनेपासून वंचित राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

करिता, उपरोक्त प्रमाणे नोंद घेऊन परीक्षा शुल्क माफीच्या अनुषंगाने पात्र विद्यार्थ्यांची माहिती सादर करण्यात यावी.

हे पत्र विद्यापीठाच्या http://bamua.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Circular/Notice या सदराखाली प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सोबत : प्रमाणपत्राचा नमूना**

विद्यापीठ प्रांगण, छत्रपती संभाजीनगर :
संदर्भ क्र. : परीक्षा व मूल्यमापन/समन्वय/२०२४/785-86
दिनांक : १९.१२.२०२४ :

**कुलसचिव**

या पत्राची प्रत : मा. सहसंचालक, उच्चशिक्षण, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव अग्रेषित

**कुलसचिव**

महाविद्यालयाचे लेटर हेड

प्राचार्य/संचालकांचे नाव :

भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक :

ई-मेल आयडी :

संदर्भ क्र.: दि. / /२०२४

# हमीपत्र

प्रमाणित करण्यात येते की, दि.०००/०००/२०२४ रोजी सादर केलेल्या यादीतील सर्व विद्यार्थी हे दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यातील महसुली मंडळातील रहिवाशी आहेत. तसेच त्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये ८ लक्ष मर्यादेपर्यंत आहे. त्यामुळे ते परीक्षा शुल्क माफीसाठी पात्र आहेत. विद्यार्थ्यांनी केंद्र शासन/महाराष्ट्र शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलतीनुसार १००% परीक्षा शुल्क माफी सवलतीसाठी अर्ज भरलेला नाही याची खात्री केलेली आहे.

तरी दुष्काळग्रस्त भागातील एकुण विद्यार्थी __________ व रु. ______________ /- एवढ्या रक्कमेची मागणी करत आहे.

करिता, प्रमाणित करण्यात येत आहे.

प्राचार्य
नाव
शिक्का